**प्र.क्र.३ ते ८ तर्फे सा. क्र.४चा अतिरिक्त सरतपास – श्री. एस. आर. पोवार वकील.**

६. आता मला दि.११.०९.२००९ रोजीचा नि. क्र.२५५ वरील ज्ञानोबा तेजम याचे मूळ मृत्यूपत्र दाखवले. त्यावरती माझे नाव, फोटो, स्वाक्षरी व निशाणी अंगठा आहे.

**सरतपास पुर्ण.**

**वादी तर्फे उलट तपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

७. माझे १९९७ साली आजरा महाविद्यालय येथे बारावी पर्यंतचे शिक्षण झाले आहे. मी कायमस्वरुपी आजरा येथे राहत आहे. मी बारावी नंतर २००८ पर्यंत आज–यातील शरद रावजी पवार डेअरीत काम करत होतो. त्यावेळी सुनिल पांडुरंग भुईंबर हे चेअरमन होते. मला डेअरीमध्ये कोणत्या महिन्यामध्ये कामाला लागलो होतो हे आठवत नाही. मी डेअरीमध्ये मिल्क टेस्टरचे काम करत होतो. मी आजअखेर गरज पडल्यास डेअरीमध्ये कामाला जात असतो. मी सन २००८ नंतर डेअरीचा कायमस्वरुपी नोकर नाही.

८. मी सन २००८ नंतर आजपर्यंत अनिल देशपांडे व काशिनाथ चराटी यांच्या आजरा सूतगिरणीत काम करत आहे. ती सूतगिरणी आजरा–गडहिंग्लज रस्त्यावरती सोहाळे फाटयासमोर आहे. मी तेथे तीन शिफ्टमध्ये काम करतो. माझी दर १० दिवसाला कामाची शिफ्ट बदलते. मी देशपांडे व चराटी यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांच्या राजकीय गटाचे काम करतो.

९. मला दि.११.०९.२००९ रोजी कोणता वार होता याबाबत सांगता येणार नाही. मी सप्टेंबर २००९ मध्ये सूतगिरणीत कामाला नव्हतो. मी गिरणीत कधीपासून कार्यरत आहे याबाबतची माहिती माझ्या सेवापुस्तकात घेतलेली आहे. मी गिरणीने मला सेवापुस्तकाची प्रत दिल्यास न्यायालयात हजर करु शकतो. मी त्याबाबत पुढील दोन दिवसात चौकशी करुन मिळाल्यास दाखल करु शकतो.

१०. मी सन २००९ सालामध्ये ग्रामपंचायतीच्या भाजी मार्केट मधील नगरपरिषदेच्या गाळयात इस्त्रीचे दुकान चालवत होतो. ते दुकान माझ्या वडिलांच्या नावावरती आहे. माझ्याकडे ते दुकान वडिलांच्या नावावरती असल्याचे दाखवणारा

कागदोपत्री पुरावा नाही. ज्ञानोबा बाळकू तेजम सूतगिरणीचा सभासद नाही. २००९ साली माझे वय २८ वर्षे होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझी ज्ञानोबा तेजम सोबत ओळख नव्हती. मी व ज्ञानोबा तेजम समवयस्क तसेच एकाच व्यवसायातील नव्हतो.

**११**. मला त्यावेळी ज्ञानोबा तेजमच्या व्यवसायाची व त्याच्या घरी कोणकोण होते याबाबतची वैयक्तिक माहिती नव्हती. माझे ज्ञानोबा तेजमकडे कोणतेही वैयक्तिक काम नवहते. ज्ञानोबा तेजम आमच्याकडे इस्त्रीसाठी कपडे घेऊन येत होता. माझे व ज्ञानोबाचे व्यवहारीक देण्याघेण्याचे संबंध नव्हते. माझ्याकडे ज्ञानोबा कपडे घेऊन येत असल्याचा कागदोपत्री पुरावा नाही. ज्ञानोबा तीन बटणांचा नेहरु शर्ट आणि हाफ चड्डी घालत होता. मला ज्ञानोबा तेजम आमच्या दुकानात कोणत्या सालापासून कोणत्या सालापर्यंत कपडे घेऊन येत होता याबाबत सांगता येणार नाही.

**१२**. मी प्रथम ज्ञानोबाला पाहिले तेव्हा त्याचे वय किती होते याबाबत सांगू शकत नाही. ज्ञानोबा सन २०२१ मध्ये वारला आहे. मी त्या दिवशी गावी नसल्यामुळे त्याच्या अंतिम विधीला जाऊ शकलो नव्हतो. मला ज्ञानोबा मयत झाल्याबाबत त्याचा पारेवाडी येथील जावई पुंडलिक बाबू निर्मळे याच्याकडून समजले होते. माझी व पुंडलिक निर्मळे ची पहिल्यापासून ओळख असून तो माझ्यासोबत डेअरीत कामाला होता. त्याचे १९९८ साली लग्न झालेले आहे. माझे व पुंडलिकचे मैत्रीचे संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यामुळे पुंडलिकने सांगितलेली सर्व कामे करतो.

**१३**. मी माझ्या स्वतःसाठी दस्त लिहून घेण्याकरीता कोणत्याही दस्तलेखकाकडे गेलेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आज–यातील दस्तलेखकांशी वैयक्तिक ओळख नाही. मला दस्तलेखक सुनिल पारळेचे पुर्ण नाव व मूळ गाव माहिती नाही. मला तो कधीपासून दस्त लिहिण्याचे काम करतो याची माहिती नाही. मला त्याच्याकडे दस्त लिहिण्याचा परवाना असल्याची माहिती नाही. पुंडलिक निर्मळेच्या पत्नीचे नाव सुनिता आहे. मी त्यांच्या लग्नाला हजर होतो.

**१४**. सुनिताला आणखीन तीन बहिणी आहेत. मला त्यातील सुनिता व कांचन बाबत माहिती आहे. मला कांचनला कोठे दिले आहे याची माहिती नाही. मला शेवटचे कांचनला कधी पाहिले ते आठवत नाही. मला कांचन कोठे राहते याची माहिती नाही.

**१५**. मला ज्ञानोबा तेजम मुलगी कांचनकडे मुंबईला उपचारासाठी गेल्याची माहिती आहे. मला ते कोणत्या वर्षी व कोणत्या महिन्यात गेले होते याची माहिती नाही. मला त्याबाबत पुंडलिक कडून समजले होते.

**१६**. भाऊसाहेब निर्मळे व्यंकटराव हायस्कूलमध्ये लॅब असिस्टंट होते. ते माझे वर्गमित्र नव्हते. पुंडलिक निर्मळे मुळे माझी भाऊसाहेब निर्मळे सोबत ओळख झाली होती. मी व भाऊसाहेब निर्मळे याने एकत्रीत काम केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी भाऊसाहेब सोबत काम केलेले नसल्यामुळे त्याचे हस्ताक्षर व स्वाक्षरी ओळखू शकत नाही. मी या प्रकरणातील मृत्यूपत्रा व्यतिरिक्त भाऊसाहेब निर्मळे सोबत एकत्रीत स्वाक्षरी केलेली नाही. मी सदर मृत्यूपत्रानंतर भाऊसाहेब निर्मळेची स्वाक्षरी पाहिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे मी भाऊसाहेब निर्मळेची मृत्यूपत्रा नंतरची स्वाक्षरी ओळखू शकत नाही.

**१७**. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्राचा दस्त लिहिताना मी तेथे हजर नव्हतो. मला मृत्यूपत्राचा दस्त लिहिला त्या दिवशी कोणता वार होता हे सांगता येणार नाही. मी दस्त लिहिणा–यांकडे १०.०० वाजेच्या दरम्यान गेलो होतो. मला आदल्या दिवशी ज्ञानोबा तेजम यांनी घरी येऊन दस्त लिहायचा असल्यामुळे यायला सांगितले होते. मी त्या दिवशी रजेवरती होतो. माझ्याकडे त्या दिवशी रजेवर असल्याचे दाखवता येणारा कागदोपत्री पुरावा नाही.

**१८**. माझी डॉ. अशोक फर्नांडीस यांच्याशी ओळख नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी त्यांच्याशी ओळख नसल्यामुळे मला त्यांच्याकडे जाण्याचा संबंध आलेला नाही. मी फर्नांडीस डॉक्टरांचे हस्ताक्षर व स्वाक्षरी ओळखू शकत नाही. मी सुनिल पारळेचे हस्ताक्षर ओळखत नाही. मृत्यूपत्राचा दस्त ११.०० वाजेच्या दरम्यान

लिहिण्यास सुरुवात केली होती. तो पुर्ण करण्यास एक तासाचा वेळ लागला होता. त्यापूर्वी पारळे अन्य दस्त लिहित होता. मला त्याने त्या दिवशी किती लोकांचे दस्त लिहिले याबाबत सांगता येणार नाही. मला तेथे आणखीन किती लोक होते व त्यांचे दस्त लिहिण्यास किती वेळ लागला याबाबत सांगता येणार नाही. पारळे संगणकावरती दस्ताचे टंकलेखन करत होता.

**१९.** पारळे हा तेजम सांगेल त्याप्रमाणे टंकलेखन करत होता. त्याने तेजम याच्याकडून माहिती घेऊन स्वतंत्र टिपण घेतले नव्हते. पारळेने दस्त लिहिताना ७/१२, ८/अ चा उतारा घेतलेला मी पाहिला होता. मला ७/१२ व ८/अ च्या उता–यांची माहिती आहे. मला पारळे याला दिलेल्या ७/१२ उता–यातील गट क्रमांक सांगता येणार नाही. मला ८/अ च्या उता–यात कोणत्या नोंदी असतात याची माहिती नाही. मला मी जाण्यापूर्वी तेजम याने पारळे यांना कोणते दस्त दिले होते याची माहिती नाही.

**२०.** मी पारळेच्या कार्यालयामध्ये त्याच्या समक्ष एक स्वाक्षरी केली होती. मी ती स्वाक्षरी मृत्यूपत्राच्या कागदावरती केली नव्हती. त्यानंतर मी दुय्यम निबंधक कार्यालयात एक स्वाक्षरी केली होती. आता मला नि. क्र.२५५ च्या दस्तावरती दाखवलेल्या स्वाक्षरी व्यतिरिक्त मी इतर स्वाक्षरी केलेली नाही. मी दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिका–यांना पुर्वीपासून ओळखत नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी मृत्यूपत्राच्या दस्तासाठी दुय्यम निबंधक कार्यालया व्यतिरिक्त इतर कोठेही स्वाक्षरी करण्यासाठी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्ञानोबा तेजम यांना ओळखत नव्हतो. दुय्यम निबंधक कार्यालयात माझ्या सोबत ओळखीसाठी भाऊसाहेब निर्मळे होता. त्याने देखील माझ्या प्रमाणे दुय्यम निबंधक कार्यालयात स्वाक्षरी केली होती. आमच्या प्रमाणे सुनिल भुईंबर, सुनिल विठोबा यांनी दुय्यम निबंधकासमोर स्वाक्ष–या केल्या होत्या. त्यांनी दुय्यम निबंधकांना त्यांचे ओळखपत्र दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी दुय्यम निबंधका समोर त्यांनी केलेल्या स्वाक्ष–या पाहिल्या नव्हत्या.

**२१.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष ज्ञानोबा तेजमचे मृत्यूपत्र झालेले

नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष पारळे याने ज्ञानोबाचे मृत्यूपत्र केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात माझ्या समक्ष साक्षीदारांनी स्वाक्ष–या केल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मृत्यूपत्रावरील साक्षीदारांच्या व दस्तलेखकाच्या स्वाक्षरी ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कांचन ही पुंडलिक निर्मळेची नातेवाईक असून तो माझा मित्र असल्यामुळे त्यांना मदत करण्यासाठी आज खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला कांचनने बोलावून साक्ष देण्याबाबत सांगितले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – १४.१०.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते